CNR - MHKO130011492016

सदाशिव स्वामी वि. मल्लेश स्वामी

# फायनल डिक्री नं.०२/२०१७ मधील नि.क्र.१९ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज धनको यांनी नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ चे कामी धनको व ऋणको यांच्यामध्ये झालेल्या दिनांक २९/०६/२०१४ रोजीच्या तडजोडीप्रमाणे दावा मिळकतीतील शेत जमिन गट नंबर ४४०/३ पैकी क्षेत्र २ हे. २३ आर. मधील मिळकतीची प्रत्यक्ष मोजणी होवून त्यांची प्रत्यक्ष वाटणी होण्याकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. धनको यांच्या कथनानुसार, नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ चे कामी तडजोड झाली असली तरी शेत जमिन मिळकत ही अदयापही एकत्रित असून, प्रत्येकाच्या स्वतंत्र क्षेत्राची नोंद ७/१२ पत्रकी झालेली नाही, तसेच शेतसारा स्वतंत्र नोंद झालेला नाही, प्रत्यक्ष कब्जा जागेवर मोजणी होवून निश्चित झालेला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष हिस्स्याची मोजणी होवून त्याप्रमाणे कब्जा ठरवून त्याप्रमाणे ७/१२ हिस्स्याच्या सदरी स्वतंत्र नोंद होणे गरजेचे आहे. धनको व ऋणको यांच्यामध्ये झालेल्या तडजोडी दरम्यान त्यांनी वाटणीबाबतचा प्रत्यक्ष नकाशा सोबत जोडलेला नाही. त्यामुळे झालेल्या मोजणीप्रमाणे प्रत्यक्ष वाटप होण्याकरीता, सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

३. सदर अर्जास ऋणको नंबर १ यांनी आपले म्हणणे दाखल केलेले असून अर्जातील मजकूर त्यांनी नाकारला आहे. ऋणको यांच्या कथनानुसार, शेत जमिनीच्या तडजोडी करताना प्रत्यक्ष चतुःसिमा ठरवून वाटप झाले आहे. त्यामुळे त्यास अंतिम हुकूमनाम्याची आवश्यकता नाही. शेत जमिनीत झालेल्या तडजोडीप्रमाणे तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे अर्ज देवून

मिळकत मोजणी करुन स्वतंत्र करुन घेण्याचे ठरले आहे. दावा मिळकतीच्या प्रत्येकाच्या हिस्स्याच्या चतुःसिमा ठरलेल्या आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज चालण्यास पात्र नसल्याने तो फेटाळण्यात यावा अशी ऋणको यांनी विनंती केली आहे.

४. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

५. उभय बाजूंच्या वादाच्या अनुषंगाने उभयतांमध्ये तडजोड झाली आहे ही बाब स्पष्ट आहे. तथापि, तडजोडीप्रमाणे प्रत्यक्ष मोजणी होवून क्षेत्र ठरलेले नाही व खातेफोड झालेली नाही असे धनको यांचे म्हणणे दिसत आहे. त्या अनुषंगाने तडजोड पुरसिसची प्रमाणित प्रत अभिलेखावरती दाखल करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करता, त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांनी मोजणी करुन प्रत्येकाचे क्षेत्र स्वतंत्र वाटप करुन घेण्याचे आहे असे नमूद आहे. सदर पुरसिसमधील परिच्छेद क्रमांक ७ चे अवलोकन करता, त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे विहिरीबाबतचे क्षेत्रदेखील मोजून त्याचा गट नंबर स्वतंत्र करण्याची कार्यवाही करण्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे वरील परिच्छेदाचे अवलोकन करता, चतुःसिमा ठरवून जरी तडजोड प्राथमिक हुकूमनामा झाला असला तरी प्रत्यक्ष मोजणी जागेवर झालेली नाही असे दिसून येते. त्यामुळे झालेल्या तडजोड पुरसिसप्रमाणे त्या तडजोडीची प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्याकरीता सदरचा प्राथमिक हुकूमनामा मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविणे योग्य राहिल असे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे–

**– आदेश –**

१. नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ मधील हुकूमनाम्याची सही शिक्क्याची नक्कल पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ५४ प्रमाणे

मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठविण्यात यावी.

२. धनको यांनी वरील आदेशाची अंमलबजावणी करणेकरीता नियमित दिवाणी कज्जा नंबर १००/२०१४ मधील हुकूमनाम्याची व शेत मिळकतीच्या ७/१२ उता–याच्या अद्ययावत सही शिक्क्याच्या प्रती त्वरीत उपलब्ध करुन दयाव्यात.

सही/-

(ए.बी.जवळे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,कागल

कागल

दिनांकः– ०९/०४/२०२१